| | |
|---|---|
| MHSN090006912024 | दाखल दिनांक – १९.०६.२०२४<br>नोंदणी दिनांक – १९.०६.२०२४<br>निकाल दिनांक – २५.०३.२०२६<br>कालावधी – १ वर्षे ९ महिने ६ दिवस |

**भाग – अ**

| | |
|---|---|
| | **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, तासगांव यांच्या न्यायालयात**<br>(पिठासीन अधिकारीः–सतिष वाय. वाकचौरे)<br>(घोषित दिनांक २५.०३.२०२६)<br>**नियमीत फौजदारी खटला क्र.१२७/२०२४ नि.क्र. ४९**<br>गु.र.क्र. – २५८/२०२३ पोलीस स्टेशन तासगांव<br>भारतीय दंड विधान कायदा कलम ३२४, ४५२,१४३,१४७,१४९,३२३, ५०४ व ५०६ अन्वये |
| फिर्यादी | सरकार |
| अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता | श्री.एस.व्ही.पाटील |
| आरोपी | १. दिनकर हिंदूराव सुर्यवंशी (मयत)<br>२. रणजित दिनकर सुर्यवंशी,<br>वय : ३० वर्षे, धंदा : शेती,<br>३. इंद्रजित दिनकर सुर्यवंशी,<br>वय : २५ वर्षे, धंदा : शेती,<br>४. अभिजित गुलाब सुर्यवंशी,<br>वय : २१ वर्षे, धंदा : शेती,<br>५. गुलाब निवृत्ती सुर्यवंशी<br>वय : ५२ वर्षे, धंदा : शेती,<br>सर्व आरोपी रा. डोंगरसोनी, ता. तासगांव, जि. सांगली. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री. बी.एन.शाळगांवकर |
| **भाग – ब** | |
| गुन्हयाची तारीख | ०१.०६.२०२३ |

| | |
|---|---|
| गुन्हा दाखल तारीख | ०२.०६.२०२३ |
| पहिली खबर दिनांक | ०२.०६.२०२३ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | १९.०६.२०२४ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २५.०८.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०७.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयांचा दिनांक | २५.०३.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त |

## आरोपींचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर.पी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | रणजित दिनकर सुर्यवंशी, | फौ.प्र.सं कलम ४१-अ प्रमाणे नोटीस | निरंक | भा.द.वी. कायदा कलम ३२४, ४५२,१४३, १४७,१४९, ३२३, ५०४, व ५०६ अन्वये | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | इंद्रजित दिनकर सुर्यवंशी, | -\|\|- | -\|\|- | -\|\|- | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ४ | अभिजित गुलाब सुर्यवंशी, | -\|\|- | -\|\|- | -\|\|- | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ५ | गुलाब निवृत्ती सुर्यवंशी | -\|\|- | -\|\|- | -\|\|- | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार

### अ. अभियोग

| श्रेणी | नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार पंच साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| १ | अशोक विलास सुर्यवंशी | ४० | फिर्यादी |
| २ | सविता अशोक सुर्यवंशी | ४२ | साक्षीदार |
| ३ | रोहन अशोक सुर्यवंशी | ४३ | साक्षीदार |

### ब. बचाव साक्षीदार व इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार पंच साक्षीदार ) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### क. कोर्ट साक्षीदार व इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार पंच साक्षीदार ) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अभियोगपक्षाचे/बचाव/कोर्ट निशाणी

### अ. अभियोग

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | ४१ | फिर्यादीची फिर्याद वरील सही (साक्षीदार क्र. १) |
| २ | ४४ | घटनास्थळ पंचनामा (बचावपक्षास मान्य) |
| ३ | ४५ | जप्ती पंचनामा (बचावपक्षास मान्य) |
| ४ | ४६ | फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र (बचावपक्षास मान्य) |
| ५ | ४७ | साक्षीदाराचे वैद्यकीय प्रमाणपत्र (बचावपक्षास मान्य) |

### ब. बचाव

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

### क. कोर्ट निशाणी

| अनु.क्र. | निशाणी क्रमाक | तपशील |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### ड. मुद्देमाल

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रमाक | तपशील |
|---|---|---|
| १ | एम.आर. क्र. ३१२/२०२३ | १. एक कळकाची तीन पे-याची ३ फुट ४ इंच लांबीची काळपट पांढ-या रंगाची जुनी वापरती काठी.<br>२. एक कळकाची चार पे-याची ३ फुट १० इंच लांबीची काळपट पांढ-या रंगाची जुनी वापरती काठी. |

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांकः– २५.०३.२०२६)

प्रस्तुत खटला आरोपींचे विरुध्द भारतीय दंड विधान कायदा कलम ३२४, ४५२,१४३,१४७,१४९,३२३, ५०४ व ५०६ अन्वये चालविण्यात

आला.

**प्रस्तुत खटल्याची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः**

२) दिनांक ०१.०६.२०२३ रोजी १६.३० ते १८ वाजेच्या सुमारास मौजे डोंगरसोनी ता.तासगांव जि. सांगली येथे फिर्यादी त्यांचे शेतामध्ये काम करत असताना आरोपी क्र. १ ते ५ हे फिर्यादीच्या जमीनीमध्ये व वन विभागाच्या जमीनीमध्ये असलेल्या वडाच्या झाडाजवळ आले व त्यांनी त्यांचेसोबत आणलेल्या जेसीबी मशीनने सदर झाड तोडले. झाड तोडलेल्या ठिकाणी खडयात मुरुम टाकणेसाठी ते फिर्यादीच्या गट क्र. ७५८ या शेतीमधून जेसीबी द्वारे मुरुम काढून ते झाड तोडलेल्या खडयात तो मुरुम टाकत होते. तेव्हा फियादी त्यांना माझ्या शेतातील मुरुम काढू नका असे सांगत असताना आरोपी सर्वजण फिर्यादीजवळ आले. त्यावेळी आरोपी क्र. ४ व ५ यांनी त्यांच्या हातातील काठीने फिर्यादीच्या पाठीवर, हातावर व पायावर मारले. तसेच आरोपी क्र. १ ते ३ यांनी हाताने व लाथा बुक्याने फिर्यादीला मारहाण केली. फिर्यादी एकटा असल्याने त्यांना प्रतिकार करु शकला नाही. तुला कोठे जाऊन तक्रार करायची आहे तेथे जाऊन तक्रार कर अशी आरोपींनी फिर्यादीला धमकी दिली व ते झाड तोडलेल्या ठिकाणी निघून गेले. त्यांनतर सायंकाळी ५.३० वाजणेचे दरम्यान फिर्यादी घरी आले व त्यांनी घडलेला सर्व प्रकार त्यांची पत्नी सविता हिला सांगितला. त्यादरम्यान साधारणतः ६ वाजता पुन्हा आरोपी क्र. १ ते ५ हे सर्वजण फिर्यादीचे घरासमोर आले व फिर्यादीचा मुलगा रोहन यास शिवीगाळ करु लागले. तेव्हा फिर्यादी व त्यांच्या पत्नीने काय झाले असे आरोपींना विचारले असता ते सर्वजण त्यांच्या घरात

घुसले. आरोपी क्र. ४ व ५ यांनी फिर्यादीची पत्नी सविता हिला धक्का देत खाली पाडले. त्यावेळी तिच्या ब्लाऊजच्या बाहया फाटल्या. त्यानंतर त्यांनी शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. आरोपी क्र. १ ते ३ यांनी पुन्हा फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण केली. घरातील दंगा ऐकून मुलगा रोहन त्यांचेकडे येत असताना आरोपी क्र. ३ यांनी त्याला धरुन ठेवले. त्यानंतर सर्वजण घरातून निघून जाऊ लागले, तेव्हा आरोपी क्र. ३ याने मुलगा रोहन यास, तु फॉरेस्टला तक्रार केली होतीस, ती मी बघून घेतो, तुझे भविष्य आता माझे हातात आहे अशी धमकी दिली व ते सर्वजण तिथून निघून गेले. म्हणून फिर्यादीने घडलेल्या घटनेची पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

३) सदरच्या फिर्याद वरुन आरोपीविरुध्द गु.र.क्र. २५८/२०२३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. पुढे तपास अधिकारी यांनी साक्षीदारांचे जाबजबाब घेवून, गुन्हातील मुद्देमाल जप्त करुन व जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करुन प्रस्तुत गुन्हयाचा तपास पुर्ण केला व आरोपी क्र. १ ते ५ यांच्याविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४) दरम्यानचे काळात आरोपी क्र. १ दिनकर हिंदूराव सुर्यवंशी हे मयत झाल्याने त्यांचा मृत्यूचा दाखला निशाणी क्रमांक २७ अन्वये दिनांक २५.०८.२०२५रोजी निशाणी क्र. १ वर आदेश पारित करुन प्रस्तुत खटला त्यांचे विरुध्द 'अबेट' करण्यात आला.

आरोपी क्र. २ ते ५ विरुध्द भारतीय दंड विधान कायदा, १८६० चे कलम ३२४, ४५२,१४३,१४७,१४९,३२३, ५०४ व ५०६ अन्वये दोषारोप निशाणी

क्रमांक २८ वर निश्चित करुन त्यातील मजकूर आरोपी यांना त्यांच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला असता, आरोपी क्र. २ ते ५ यांनी अनुक्रमे निशाणी क्र. २९ ते ३२ नुसार गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

५) प्रस्तुतचा गुन्हा सिध्द करणेसाठी अभियोग पक्षातर्फे तपासलेल्या साक्षीदाराच्या पुराव्यातून आरोपींविरुध्द आक्षेपाहार्य विधान न आल्यामुळे आरोपी क्र. २ ते ५ चे फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम ३१३ अन्वये निवेदन माफ करण्यात आले.

६) अभिलेखावरील पुरावा व दोन्ही पक्षाचे कथन लक्षात घेवून खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात व त्यावर मी माझ्या कारणमिमांसेसह निष्कर्ष देत आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक ०१.०६.२०२३ रोजी १६.३० ते १८ वाजेचे सुमारास मौजे डोंगरसोनी, ता. तासगांव, जि. सांगली येथील फिर्यादीच्या शेतामधील आरोपी क्र. २ ते ५ व मयत आरोपी क्र. १ यांनी बेकायदेशीर जमाव जमवून त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी त्यांचेपैकी आरोपी क्र. ४ व ५ यांनी लाकडी काठीने फिर्यादीच्या पाठीत, हातावर व पायावर मारुन फिर्यादीस इच्छापूर्वक गंभीर दुखापत पोहचविली आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कायदा **कलम ३२४ सह कलम १४९** अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | उपरोक्त नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. २ ते ५ व मयत आरोपी यांनी त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करण्याकरिता फिर्यादी, त्याची पत्नी व मुलगा यांना मारहारण करण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या घरामध्ये अतिक्रमण केले आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कायदा **कलम ४५२ सह कलम १४९** अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ३. | उपरोक्त नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. २ ते ५ व मयत आरोपी क्र. १ यांनी त्यांचे सामाईक उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमविला व त्या जमावाचे सदस्य झाले आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कायदा **कलम १४३ सह कलम १४९** अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ४. | उपरोक्त नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. २ ते ५ व मयत आरोपी क्र. १ यांनी त्यांचे सामाईक उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमविला व दंगा केला आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कायदा **कलम १४७ सह कलम १४९** अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ५. | उपरोक्त नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. २ ते ५ व मयत आरोपी क्र. १ यांनी त्यांचे सामाईक उद्दीष्ट साध्य करण्यासाठी त्यांचेपैकी आरोपी क्र. २ व ३ व मयत आरोपी क्र. १ यांनी फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली आणि त्याद्वारे भारतीय दंड विधान कायदा **कलम ३२३ सह कलम १४९** अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द | नाही |

| | | |
|---|---|---|
| | करतो काय ? | |
| ६. | उपरोक्त नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. २ ते ५ व मयत आरोपी क्र. १ यांनी त्यांचे सामाईक उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमविला व फिर्यादी व त्याच्या कुटुंबीयांचा अपमान करुन त्यांना प्रक्षोभित केले आणि अशा प्रलोभनामुळे त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा म्हणून त्यांनी शिवीगाळ केली आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कायदा **कलम ५०४ सह कलम १४९** अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही |
| ७. | उपरोक्त नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. २ ते ५ व मयत आरोपी क्र. १ यांनी त्यांचे सामाईक उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमविला व फिर्यादीचा मुलगा रोहन यास फौजदारी धाकदपटशा दाखवून त्याच्या जिवीतास धोका उत्पन्न करण्याची धमकी दिली आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कायदा **कलम ५०६ सह कलम १४९** अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ८. | आदेश काय ? | आरोपी क्र. २ ते ५ यांची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

७) आरोपींविरूध्द गुन्ह्याचे घटक सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाद्वारे वर नमुद साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. या व्यतिरीक्त अन्य कोणताही तोंडी पुरावा अभियोग पक्षाने अभिलेखावर दाखल केलेला नाही. सदर तोंडी पुराव्या व्यतिरिक्त अभियोग पक्षाने आपली भिस्त निशाणी क्र. ४४ वरील घटनास्थळ पंचनामा, निशाणी क्र. ४५ वरील जप्ती पंचनामा, निशाणी क्र. ४६ वरील फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र व निशाणी क्र. ४७ वरील साक्षीदाराचे वैद्यकीय प्रमाणपत्र या कागदपत्रांवर आपली भिस्त ठेवली आहे. मुळ फिर्यादीने सदर प्रकरणामध्ये निशाणी क्रमांक ३७ अन्वये वकीलपत्र दाखल करुन निशाणी क्र. ३८ अन्वये तडजोड करण्यास परवानगीचा अर्ज दाखल केला. परंतू, सदर प्रकरणातील गुन्हे तडजोडपात्र नसल्याने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात आला. शेवटी निशाणी क्र. ४८ अन्वये मुळ फिर्यादीने पुरावा बंद केल्याची पुरशिस अभिलेखावर दाखल केली.

८) अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी वकील श्री.एस.व्ही.पाटील व आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. बी.एन.शाळगांवकर यांचा युक्तिवाद ऐकला.

**मुद्दा क्र.१ ते ७ करीता :**

९) मुद्दा क्र. १ ते ७ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांच्या कारणांची व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व मुद्दे मी एकत्रीत विचारार्थ घेतले आहेत.

१०) अशोक विलास सुर्यवंशी साक्षीदार क्र. १ निशाणी क्र. ४० हे प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी असुन त्याचे पुराव्यात असे आले आहे की, ते

आरोपींनी ओळखतात. त्यांचे आरोपींसोबत कोणतेही वाद झालेले नाहीत.

११) सविता अशोक सुर्यवंशी साक्षीदार क्र. २ निशाणी क्र. ४२ व रोहन अशोक सुर्यवंशी साक्षीदार क्र. ३ निशाणी क्र. ४३ हे दोन्ही साक्षीदार फिर्यादीच्या कुटुंबातील असून त्यांनी देखील त्यांच्या पुराव्यामध्ये ते आरोपींना ओळखतात व त्यांचे आरोपींसोबत कोणतेही वाद झालेले नाहीत असे कथन केलेले आहे.

१२) सदर तीनही साक्षीदारांनी अभियोग पक्षास मदत होईल असे कोणतेही विधान सरतपासादरम्यान केलेले नसल्यामुळे सहा. सरकारी वकिलांनी साक्षीदारांना उलटतपासात विचारता येतील असे प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, ती देण्यात आली. परंतु सहा. सरकारी वकिलांनी उलट तपासात विचारता येतील असे प्रश्न विचारुन देखील सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षास मदत होईल असे कोणतेही विधान पुराव्यादरम्यान केलेले नाही. उलट पुराव्यादरम्यान विचारलेल्या सर्वच उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे साक्षीदारांनी नकारार्थी देवून घटना स्पष्टपणे नाकारली आहे.

१३) एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अभियोग पक्षाने तपासलेल्या तीनही साक्षीदारांनी घटनेची तारीख, वेळ व ठिकाण पुराव्यादरम्यान सांगितलेले नाही. अभियाग पक्षाचे असे कथन आहे की, आरोपी क्र. ४ व ५ यांनी फिर्यादीस काठीने व आरोपी क्र. १ ते ३ यांनी फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच फिर्यादीचा मुलगा रोहन यास जीवे मारण्याची धमकी दिली. परंतु सदर साक्षीदाराने प्रस्तुत घटना पुराव्यामध्ये स्पष्टपणे नाकारली आहे. बचाव पक्षाने घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा मान्य केले असले तरी त्याद्वारे घटना अगर जप्ती प्रस्तुत गुन्हयाच्या अनुषंगाने सिध्द झाली आहे असे

म्हणता येणार नाही. वैद्यकीय प्रमाणपत्र देखील बचावपक्षाने मान्य केले आहे परंतु अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांनी घटना स्पष्टपणे नाकारुन आरोपींनी त्यांना कोणतीही मारहाण केली नसल्याने पुराव्यादरम्यान सांगितले आहे. यास्तव सदर वैद्यकीय प्रमाणपत्रांची प्रस्तुत गुन्हा सिध्द करताना अभियोग पक्षास मदत होताना दिसत नाही. सबब अभिलेखावर आलेल्या पुराव्यात आरोपी क्र. २ ते ५ व मयत आरोपी क्र. १ यांनी त्यांचे सामाईक उद्दीष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवून, त्या जमावाचे सदस्य झाले व दंगा केला या बाबीदेखील पुराव्यानिशी सिध्द होताना दिसत नाहीत. एकंदर अभिलेखावर आलेल्या पुराव्यात आरोपीविरुध्द गुन्हयाचे कोणतेही घटक अभियोग पक्षाने सिध्द केलेले नाहीत असे अनुमान निघते. यास्तव मी मुद्दा क्र. १ ते ७ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र. ८ करिता**

१४) वरील सर्व बाबी विचारात घेऊन अभियोग पक्षाने आरोपी क्र.२ ते ५ यांच्याविरुध्द गुन्हयाचे कोणतेही घटक पुराव्यानिशी सिध्द केलेले नसल्यामुळे आरोपी क्र. २ ते ५ हे प्रस्तुत गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. यास्तव प्रस्तुत गुन्हयातील जप्त मुद्देमाल २ कळकाच्या काठया यांची योग्य ती विल्हेवाट लावण्याकरिता व आरोपींची प्रस्तुत गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्याकरिता मुद्दा क्र. ८ चे उत्तरार्थ, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) आरोपी क्र.२. रणजित दिनकर सुर्यवंशी,३. इंद्रजित दिनकर सुर्यवंशी,४. अभिजित गुलाब सुर्यवंशी,५. गुलाब निवृत्ती सुर्यवंशी यांची भारतीय दंड विधान कायदा कलम ३२४, ४५२,१४३,१४७,३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ मधून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१)

अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपी क्र. १ हे मयत असल्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रस्तुत प्रकरणात 'अबेट'चा आदेश पारित केलेला आहे.

३) आरोपी क्र. २ ते ५ यांचा जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

४) जप्त मुद्देमाल एक कळकाची तीन पे-याची ३ फुट ४ इंच लांबीची काळपट पांढ-या रंगाची जुनी वापरती काठी व एक कळकाची चार पे-याची ३ फुट १० इंच लांबीची काळपट पांढ-या रंगाची जुनी वापरती काठी हे मूल्यहीन असल्याने ते दोन्ही आर्टीकल अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावेत.

५) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये आरोपी क्र २ ते ५ यांनी रु.१५०००/– प्रत्येकी वैयक्तिक मुचलका देण्याची पुर्तता करावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

SATISH YASHWANT WAKCHAURE
Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2026.03.25 17:54:37 +0530

दिनांक : २५.०३.२०२६

( एस.वाय. वाकचौरे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, तासगांव.